You Tube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | सोमवार, दि. २६ जुलै २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

## पावसात ताळपत्रीच्या छत्रात अंत्यविधी

# अंतीम प्रवासही प्रचंड वेदनादायी!



**गजानन देवाळकर**
**यवतमाळ(मारेगाव)**

जन्मा पासून ते मरना पर्यत शासनाच्या विविध योजना अस्तित्वात आहे.मात्र यंत्रनेच्या नियोजन शून्य कार्यप्रणालीमुळे नागरिकांना लाभा पासून वंचीत राहावे लागत आहे. मानवाच्या विकासा करिता शासन स्तरावरून विविध योजना राबविल्या जात असताना खैरगांव (बुट्टी )ग्रामपंचायतच्या हद्दीत येत असलेल्या दापोरा या छोट्याशा गावात अजूनही अंत्यविधीसाठी शेडची व्यवस्था करण्यात आली नसल्याने भरपावसात मृतदेहाला अग्नी देताना

> दापोरा छोटे गाव असल्यामुळे लोकप्रतिनिधी या गावाकडे फारसे लक्ष देत नाही.स्मशानभूमीची मागणी गेल्या अनेक दिवसापासूनची असताना राजकारणाच्या चक्रव्हूवात यापूर्वी च्या कार्यकाळात दुर्लक्ष झाले. आता मात्र स्मशानभूमीला प्राधान्य क्रम असून लवकरच स्मशानभूमी उभारण्यात येईल असे खैरगाव दापोरा गटग्रामपंचायत चे सरपंच रामचंद्र जवादे यांनी साप्ताहिक सह्याद्रीचा राखणदारला सांगितले.

ताळपत्रीचा वापर करावा लागत आहे. गेल्या काही दिवसा पासून सततधार पावसाचा कहर सुरु आहे. जन्म आणि मृत्यू दोन्ही घटना नैसर्गिक असल्यामुळे कधीही घडतं आहे. अशातच मारेगाव तालुक्यातील खैरगांव ग्रामपंचायत च्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या दापोरा या गावात सुभाष जवादे या वृद्धाचा काल २३ जुलै ला मृत्यू झाला. सततधार पाऊस थांबण्याची शक्यता नसल्याने नातेवाईकांना पावसात अत्यविधी पार पडावा लागला आहे. मात्र या गावात स्म्शानभूमीला शेड नसल्यामुळे अत्यविधीला मोठी अडचनीचा सामना करावा लागला आहे. अजूनही काही गावात शेड ची व्यवस्था नसल्याने मृतदेह अर्धवट जळून विटंबणा होत असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे. मात्र काल दापोरा येथील मृतक जवादे याचा पार्थिवास अग्नी देताना चित्ता पावसाने विझू नये यासाठी त्याच्या सरणावर त्याच्या नातेवाईकांनी टाळपत्रिचा तंभु उभारून चिंताग्नी दिला. शेड अभावे चिता जळणार कशी? असा प्रश्न उभा असताना त्यांनी प्रसंगावधान ओळखून अंत्यविधी पार पडला आहे. त्यामुळे गावा गावात स्म्शानभूमीच्या सौंदर्यीकरणासाठी शासन लाखो रुपयाचा निधी खर्च करीत असताना आमच्या गावाला योजनेचा लाभ का नाही असा संताप जनक प्रश्न दापोरावासी उपस्थित करीत आहे.

## देशी कट्टा व पिस्तुलसह शस्त्र जप्त

### विधीसंघर्ष बालकांचा समावेश असल्याचा संशय



**राजुरा / प्रतिनिधी**

शहरातील सोमनाथपुर वार्डात शस्त्रसाठा लपवून ठेवले असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घराची झाडाझडती घेतली. त्यात त्यांना देशी बनावटीचे पिस्टल, एक देशी कट्टा,एक स्टील तलवार व चक्र असलेला घातक रॉड आढळून आले. यातील काही शस्त्र पानठेल्यावर लपवून ठेवली होती. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आले असून काही विधिसंघर्ष बालक असल्याची माहिती आहे.शहरात शस्त्र मिळाल्याने खळबळ माजली आहे.

राजुरा पोलीस सकाळची पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना शस्त्रसाठाची गुप्त माहिती मिळाली.लगेच पोलिसांनी घराभोवती सापळा रचून झाडाझडती घेतली असता त्यात घातक शस्त्रे आढळून आली.यात स्टीलची तलवार,पिस्टल लायटर,देशी कट्टा व चक्र असलेले हत्याराचा समावेश आहे. यातील काही शस्त्र पानठेल्यावर लपवून ठेवली होती. शस्त्र जप्त करून लांबजोतसिंग हरदेव सिंग देवल या आरोपींला अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात आणखी काही विधिसंघर्ष बालक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## वढोली - लिखितवाडा पुलाची तहसीलदारांकडून पाहणी

### पंधरा दिवसांपासून मार्ग बंदःरपट्याअभावी शंभर शेकऱ्यांची शेती संकटात

**गोंडपिपरी / प्रतिनिधी**

लिखितवाडा-वढोली मार्गावर पुलाचे बांधकाम सुरू असून शेतकऱ्यांना,प्रवास करणाऱ्या नागरिकांना पर्यायी व्यवस्था म्हणून डायवरशन काम करणे कंत्राटदाराला अनिवार्य असते.तशी निधी देखील मिळते संततधार पावसामुळे पुरपरस्थितीमुळे लिखितवाडा नाल्याच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ होऊन आहे.पर्यायी बनवलेला रपटा वाहून गेल्याने वढोली येथील शंभर शेतकऱ्यांची शेती पंधरा दिवसांपासून संकटात आली असून एक किलोमीटर चे शेत



गाठायचे असल्यास १० किलोमीटर बोरगाव,वडकुली मार्गे प्रवास करून शेत गाठावे लागत असल्याने वढोली येथील शेतकरी चिंतेत सापडला आहे काहींनी तर गेल्या पंधरा दिवसांपासून आपल्या शेतात पाय देखील ठेवला नाही शेती उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.लिखितवाडा - वढोली मार्गावर तात्काळ रपटा बनवुन किव्हा पुलाचा मार्ग सुरू करून घ्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.दि.२२ शुक्रवारी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकऱ्यांनी निदर्शने केली.आज दि.२५ (सोमवार) गोंडपीपरिचे तहसीलदार के.डी मेश्राम यांनी लिखितवाडा पुलाच्या मार्गाची पाहणी करून ५ दिवसात पुलावरील वाहतूक किव्हा पर्यायी व्यवस्था म्हणून रपटा बनवून द्यावा असे निर्देश बांधकाम विभागाला व कंत्राटदाराला दिले.सोबतच महावितरणच्या अधिकाऱ्यांशी बोलून पुलावरील स्ट्रिट लाईन हटवन्याच्या सूचनाही दिल्या.

## माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते संपन्न होणार ६ जुलै रोजी लख्मापूर हनुमान मंदीराचे भूमीपूजन

### ६० लक्ष रू. खर्चुन सौंदर्यीकरण व संरक्षण भिंतीचे बांधकाम.

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हयामध्ये विकासाची गंगा प्रवाहीत करणारे माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातुन लख्मापूर स्थित हनुमान मंदिराचे सौंदर्यीकरण व संरक्षण भिंतीचा भुमीपूजन सोहळा दिनांक २६ जुलै २०२२ रोजी सायं. ४.३० वा. लखमापूर हनुमान मंदिर परिसर लखमापूर येथे संपन्न होतो आहे.

आ. सुधीर मुनगंटीवर यांच्या प्रयत्नातुन लखमापूर येथे १५ हजार स्वॉअर फुट जागेवर ६० लक्ष रू. खर्चुन



सौंदर्यीकरण व संरक्षण भिंतीचे बांधकाम शासनाच्या लेखाशिर्ष २५१५ या मुख्य योजनेतुन होते आहे. चंद्रपूर जिल्हयातील अनेक विकासाची कामे झाली असून अनेक कामे प्रगती पथावर आहे. चंद्रपूर जिल्हयाचा चेहरा-मोहराच विकासाने बदलवून टाकण्याचा प्रण आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे.

या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून भाजपाचे जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, माजी महापौर राखी कंचर्लावार, भाजपा नेते रामपाल सिंह, जिल्हा महामंत्री नामदेव डाहूले, प्रदेश सचिव अनिल डोंगरे, तालुकाध्यक्ष हनुमान काकडे, माजी जि.प. सदस्या रोशनी खान, वनिता आसुटकर, माजी पंचायत समिती सभापती केमा रायपुरे, लखमापूर हनुमान मंदिर कमेटी अध्यक्ष सुरेश शर्मा उपस्थित राहतील. या भुमीपूजन सोहळयाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टी तालुका चंद्रपूर च्या वतीने करण्यात आले आहे.

## लोकन्यायालयाचा पक्षकारांनी लाभ घ्यावा

### न्यायाधीश एन.पि.वासाडेःमारेगाव येथे १३ ऑगस्टला आयोजन

**मारेगाव / प्रतिनिधी**

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मारेगाव तालुका विधी सेवा समिती व मारेगाव न्यायालयाच्या वतीने १३ ऑगस्ट ला मारेगाव न्यायालयात लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे.यात सहभागी होउन पक्षकारांनी लोक न्यायालयाचा लाभ घ्यावा असे आवाहन मारेगाव तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा न्यायाधिश एन.पि. वासाडे यांनी केले आहे.

न्यायदानाची प्रक्रिया क्लिष्ट आहे. न्यायालयात असंख्य प्रकरणे तुंबून पडली आहेत. त्यामुळे गोरगरीबांना जलद गतीने न्याय देण्याचा उद्देश साध्य होत नाही पक्षकारांची वेळ व पैशाची बचत करण्यासाठी लोकन्यायालय उपयुक्त असून याद्वारे सामोपचार तडजोडीतून न्यायालयीन प्रकरणात दोन्ही बाजूंचे समाधान होऊ शकते. न्यायाल्यावरचा भार कमी होउन गोरगरीबांना समाधानाने व लवकर न्याय मिळू शकतो. त्यामुळे लोक न्यायालयाकडे लोकांना कल वाढला आहे. या प्रक्रियेत लोकांमध्ये लोकन्यायालया विषयी अधिक विश्वास निर्माण झाल्यास लोकन्यायालयाची चळवळ अधिक बळकट होउ शकते, असे मत न्यायाधीश एन. पी. वासाडे यांनी व्यक्त केले. ता.१३ ऑगस्ट ला आयोजित आलेल्या लोकन्यायलयात मोटार वाहन कायदा अंतर्गततची प्रकरणे, अधिकोश अनादर प्रकरण,बॅंक व फायनान्स कंपनीचे वसुली प्रकरणे, भुसंपादन प्रकरणासह शेतजमि प्रकरणे,कर भरणा, वीज बिल, पाणी बिल प्रकरणासह फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे वैवाहिक व इतर दिवाणी प्रकरणाचा समावेश राहणार आहे. या न्यायालयासाठी न्यायाधीश, वकील व सामाजिक कार्यकर्ता यांचा समावेश असलेले एक पॅनल तयार करण्यात आले आहे. या लोक न्यायालयाला पक्षकारांनी सहयोग द्यावा, असे आवाहन न्यायाधीश एन.पी.वासाडे यांनी केले आहे.

## राजुऱ्यात लाचखोर प्रवृत्ती वाढली?

### महिला तलाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ताब्यात ?

**राजुरा / प्रतिनिधी**

एका फेरफार प्रकरणात लाच मगितल्याच्या आरोपावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकून राजुरा तालुक्यातील सास्ती साझ्याचे महिला तलाठी यांना लाचलुचपत विभागाचे अधिकारी यांनी सापळा रचून ताब्यात घेतल्याची घटना दिनांक २५ जुलै रोजी दुपारी घडली आहे

सास्ती शिवारात फिर्यादी यांनी एक शेत खरेदी केलेलं होते खरेदी विक्री चे सर्व कागदपत्रे देऊनही सास्ती साझ्याचे महिला तलाठी यांनी फेरफार करण्यास वेळकाढूपणा करीत पैशाची मागणी करीत अर्जदार यांना याचा संशय आल्याने व आगाऊ पैसे देण्याची फोन द्वारे मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने चंद्रपूर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात रीतसर तक्रार केली. सर्व प्रकरणाची पळताळणी करून सास्ती येथील त्या महिला तलाठी यांना फेरफार प्रकरणात आगाऊ पैसे मागितल्याचे स्पष्ट झाल्याने चंद्रपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पथकाने महिला तलाठीस ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू केली आहे बातमी लिहिपर्यंत कारवाई सुरू होती. आठवळ्यापूर्वीच याच तालुक्यातील वरूर येथील तलाठी याचे वरही लाचलुचपत प्रकरणी कारवाई झाली होती त्याची शाई वाळते ना वाळते आज याच तालुक्यात अश्याच प्रकरणात दुसरे तलाठी अडकल्याने महसूल विभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## नवनियुक्त कुलसचिव आणि अधिष्ठाता यांचे शिक्षण मंचकडून स्वागत



**गडचिरोली / प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील नवनियुक्त कुलसचिव अनिल हिरेखन तसेच नवनियुक्त अधिष्ठाता मानव्य विज्ञान, डॉ. ए. चंद्रमौली व नवनियुक्त अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान डॉ. राजीव वेगीनवार यांचे गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच या प्राध्यापक संघटनेच्यावतीने नुकताच स्वागत समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. गोंडवाना विद्यापीठाच्या या पदावर नुकत्याच नियुक्त्या पार पडून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी नुकतेच आप-आपल्या पदाचा कार्यभार सांभाळायला सुरूवात केली आहे.

गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच याबाबतीत नेहमीच पुढाकार घेऊन पदाधिकाऱ्यांचा मानसन्मान करत असते. व महाविद्यालयीन शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे प्रश्न पदाधिकाऱ्यांना अवगत करून देत असते.

यावेळीही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंचचे अध्यक्ष डॉ. पी. अरूणप्रकाश, महामंत्री डॉ. रुपेन्द्रकुमार गौर, कोषाध्यक्ष डॉ. रमेश सोनटक्के, कार्यालयमंत्री डॉ. योगेश पाटील, सह कोषाध्यक्ष डॉ. विनोद कुकडे, सचिव डॉ. अनिल चहांदे, गडचिरोली जिल्हा उपाध्यक्ष डॉ. किशोर वासुरके, डॉ. प्रमोदकुमार सिंह, प्रा. सुरेश कांती आदी मान्यवर उपस्थित होते.

## वर्धा नदीच्या पुरात वाहून गेल्या नावी, होळी, रुख, जाळे

### भोई बांधवांना सुद्धा पुराच्या झळा, भरपाई द्यावी, तहसीलदारांना निवेदन

**मारेगाव/ प्रतिनिधी**

वर्धा नदी किनारी असलेल्या चिंचमंडळ या गावातील बहुतांश भोई बांधव मच्छिमारीचा व्यवसाय करतात. वर्धा नदी किनारी, नावी, होळी, रुख, जाळे, बांबू ठेवली होती, अचानक आलेल्या पुरात सर्व साहित्य वाहून गेले. यामुळे मच्छिमारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कोळी बांधवावर जगण्याच प्रश्न उभा ठाकला आहे. नुकसान भरपाई मिळावी करीता तहसीलदार दिपक पुंडे



यांना निवेदन देण्यात आले आहे.

मारेगाव तालुक्याला वर्धा नदीचे पात्र लाभले असुन दैनंदिन कोसळणाऱ्या पाऊसधारा आणि प्रकल्पाचे पाणी सोडल्याने पुरपरिस्थिती निर्माण होऊन गावे पुराच्या विळख्यात आली घरे पडली, शेती क्षेत्र खरडून निघाली, रस्ते वाहून गेले एवढेच नाही तर चिंचमंडळ येथिल वर्धा नदी किनारी मासेमारी करणाऱ्या भोई बांधवाच्या होळी, नावी, रुख, जाळे, बांबू सर्व साहित्य पुरात वाहून गेले.मासेमारी करून उदरनिर्वाह करणे असे काम होते परंतु आता जगण्याचा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे. नुकसानीचा मोबदला मिळाला तर पुन्हा मासेमारी करता येईल जगण्याला आधार मिळेल हीच अपेक्षा घेऊन कोळी बांधव तहसील कार्यालयात येऊन नुकसान भरपाई मिळावी करीता तहसीलदार दिपक पुंडे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी उपसरपंच प्रफुल विखणकर, रवींद्र मांढरे, मदन शिवरकर, बापूराव मांढरे, विठ्ठल मांढरे, संजय नान्ने, संजय मांढरे, शकर शिवरकर, मारोती शिवरकर, सचिन पारशिवे, सूर्यभान पचारे, सुरेश शिवरकर, पद्माकर शिवरकर, विठ्ठल शिवरकर, दशरथ कामतवार, रवि पचारे, गुरुदेव पचारे उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत करा - प्रहार सेवक शेरखान पठाण यांची मागणी

**वरोरा / प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असून या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. परिसरातील नदी नाल्यांना पूर आला असून यात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत जाहीर करावी अशी मागणी निवेदनाद्वारे प्रहार जनशक्ती पक्ष चंद्रपूरचे प्रहारसेवक शेरखान पठाण यांनी



मुख्यमंत्र्यांना केली आहे.

अनेक गावांमध्ये आलेल्या मुसळधार पावसामुळे व पुरामुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक घरांची पडझड झाली आहे या नागरिकांनाही तात्काळ मदत करावी या आशयाचे निवेदन देण्यात आले यावेळी प्रहारसेवक शेरखान पठाण, गीता फुलकर, रुपेश वैद्य, अश्विनी नागरीकर, अमोल दातारकर तथा इतर प्रहारसेवक उपस्थित होते.

# अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला कोविड लसीकरणाचा आढावा

## आरोग्य व शिक्षण विभागाने समन्वय ठेवण्याच्या सूचना

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
कोविड व्हॅक्सीन अमृत महोत्सव' अंतर्गत जिल्ह्यात १५ जुलै ते ३० सप्टेंबर २०२२ या ७५ दिवसांत मोफत बुस्टर डोज देण्यात येणार आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने आरोग्य विभागाला सूक्ष्म नियोजन करण्याच्या सुचना केल्या आहेत. याच अनुषंगाने अतिरिक्त जिल्हाधिकारी विद्युत वरखेडकर यांनी कोविड लसीकरणाच्या प्रगतीचा जिल्हास्तरीय टास्क फोर्सच्या बैठकीत आढावा घेतला. यावेळी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा गौरकार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार



गहलोत, पोलिस उपअधिक्षक (गृह) राधिका फडके, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार, जिल्हा लसीकरण अधिकारी डॉ. संदीप गेडाम, डॉ. मेश्राम आदी उपस्थित होते.जिल्ह्यात लसीकरणाची गती वाढविणे गरजेचे असून ठराविक दिवसात बुस्टर डोज देण्याचे उद्दिष्ट आपल्यासमोर आहे, असे सांगून श्रीमती वरखेडकर म्हणाल्या, शाळा — महाविद्यालयात १२ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचे सुध्दा लसीकरण करायचे आहे. त्यासाठी आरोग्य व शिक्षण विभागाने योग्य समन्वयाने काम करावे. शाळांमध्ये लसीकरणाचे विशेष सत्र लावले तर त्यात परिसरातील पात्र नागरिकांना बूस्टर डोज सुद्धा देणे सोयीचे होईल. प्रत्येक तालुक्यात लसीकरणाचे दैनंदिन उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नोडल अधिका-यांची नियुक्ती करा. गावात लसीकरणाचे सत्र लावण्याच्या दोन दिवसांपूर्वीपासून नोडल अधिका-यांनी गावक-यांमध्ये जनजागृती करावी. तसेच जिल्ह्यातील विविध आस्थापना जसे जिल्हा परिषद, पोलिस विभाग, बँका, न्यायालये, औष्णिक विद्युत केंद्र, विविध उद्योग आणि खाजगी आस्थापनांमध्ये लसीकरणाचे विशेष सत्र आयोजित करावे, अशा सुचना त्यांनी केल्या.जिल्ह्यात १० लक्ष ४३ हजार ८५३ नागरिकांना बुस्टर डोज देण्याचे नियोजन असून यात ९ लक्ष ५३ हजार ५३९ कोव्हीशिल्ड तर ९०३१४ कोव्हॅक्सिनचा समावेश आहे.

कोविड हॅक्सीन अमृत महोत्सव अंतर्गत चंद्रपूर महानगर पालिकेतर्फे आतापर्यंत ८०२१ कोविशिल्ड आणि १५१३ कोव्हॅक्सीन असे एकूण ९५३४ डोज देण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

# विनयभंग प्रकरणी सावरगाव येथील आरोपीस ३ वर्षाची शिक्षा

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
नागभीड तालुक्यातील तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सावरगाव येथील आरोपीस स्वतःच्या पोटच्या मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी जिल्हा सत्र न्यायधिस अनुराग दीक्षित यांनी ३ वर्षाचा करावास व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा बुधवार दि.२० जुलै रोजी थोठावली.

पत्नी बाहेर कामाला गेली असल्याने घरात कोणी नसल्याची संधी साधून वासनानंद आरोपीने स्वतःच्या पोटच्याच मुलीचा विनयभंग मागील काही दिवसात केला होता. या प्रकरणी तळोधी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली होती. दरम्यान आरोपीस अटक करून चंद्रपूर येथील कारागृहात रवानगी करण्यात आली होती. या घटनेचा तपास महिला पोलीस निरीक्षक पूनम पाटील व पोलीस उपनिरीक्षक चंदा दंडवते यांनी पुराव्यानिशी दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. न्यायालयाने संपूर्ण तपासणी दरम्यान योग्य पुराव्याच्या आधारे बुधवारी २० जुलै रोजी कलम ३५४(अ)१ आय भांदवी सह कलम ८ पोक्सो कायद्याअंतर्गत ३ वर्षाच्या करावासाची व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. फिर्यादीच्या बाजूने सरकारी वकील स्वाती देशपांडे यांनी काम पाहिले. व कोर्ट पॅरेवी नायब पोलीस अधिकारी विजय वाकडे यांनी सहकार्य केले. हा महत्त्वपूर्ण निकाल न्यायधिस अनुराग दीक्षित यांनी सुनावला.

# ओला दुष्काळ जाहीर करून अर्थसहाय्य करा

## अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची मागणी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
संपूर्ण महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्हा ओला दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर दोन लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात यावे अशी मागणी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या चंद्रपूर जिल्हा शाखेने केली आहे. पक्षाच्या शिष्टमंडळानेपक्षाध्यक्ष प्रवीण हेमचंद्र खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनात आज दुपारी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना मुख्यमंत्र्यांच्या नावे मागण्याचे निवेदन सादर केले.मागील पंधरा दिवसात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात पडलेल्या भयंकर पावसामुळे विविध भागात पूर परिस्थिती मोठ्या प्रमाणात निर्माण झाली अनेक गावांमध्ये आणि शहरात पुराचे पाणी शिरले त्याच बरोबर लाखो शेतकऱ्यांचे पीक पाण्याखाली येऊन नष्ट झाले काही शेतकऱ्यांचे रोवने सुद्धा पुरामुळे होऊ शकले नाही. अनेक लोकांचे घरे क्षतीग्रस्त झाले आणि घरातील सामान वाहून गेले त्यामुळे आर्थिक कोंडी झाली



आहे. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य जनता अत्यंत हवालदिल झाली असून त्यांना तातडीने दिलासा देण्याची गरज आहे. असे निवेदनातुन मागणी केली आहे तेव्हा महाराष्ट्र शासनाने झालेल्या नुकसानीची त्वरित पाहणी करून संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्हात ओला दुष्काळ जाहीर करावा आणि नागरिकांना दुष्काळग्रस्तांसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ द्यावा अशी मागणी अखिल रिपब्लिकन पक्षाने केली आहे. त्याचप्रमाणे पूरपरिस्थितीमुळे अनेक भागात रोगराई पसरण्याची भीती असून दुर्गम भागात आरोग्य सुविधा वेळेवर व पुरेशा प्रमाणात पोहोचत नसल्याने त्या भागातील नागरिकांची बरीच गैरसोय होत आहे. तरी अशा लोकांना तातडीने आरोग्य सेवा पुरविण्यात याव्या व सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुख्यालयी राहण्यास निर्देश देण्यात यावे अशीही मागणी अखिल रिपब्लिकन पक्षाने केली आहे.

# रस्त्यासाठी गावकऱ्यांचा कंपनी विरोधात एल्गार



## अल्ट्राटेक कंपनी समोर छेडले धरणे आंदोलन शाळकरी विद्यार्थ्यां आदोंलनात सहभागी

त्यांनतर शासनाशी गावकऱ्यांच्या प्रतिनिधीला सोबत घेऊन बैठक घेण्यात येईल व तो स्थायी स्वरूपाचा सिमेंट कॉंक्रीट मजबूत रस्ता करण्यात येईल त्यासोबत रस्त्याच्या बाजूला लाईट ची व्यवस्था करण्यात येईल असे आस्वासन देण्यात आले. शिष्टमंडळाने कंपनीनी दिलेल्या आस्वासन ची माहिती गावकऱ्यांना दिली व त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनानंतर गावामध्ये सरपंच अलका पायपरे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. त्यावेळी उपस्थितांना शैलेश लोखंडे, नरेंद्र मडावी, कवडू गेडाम यांनी मार्गदर्शन केले.

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
कोरपना तालुक्यातील मौजा पालगाव ते अल्ट्राटेक सिमेंट कंपनीपर्यंतचा रस्त्याचे बांधकाम करावे या मागणीसाठी थेट कंपनीच्या प्रशासन भवना समोर गावकऱ्यांनी धरणे आंदोलन केले. गेल्या ३० वर्षापासून पालगाव ते कंपनी पर्यंतचा रस्ता कच्चा असून सदर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करावे अशी मागणी गावकरी करीत आहे. रस्त्या लगतच अल्ट्राटेक सिमेंट कंपनीची खदान असून रस्ता कच्चा स्वरूपात आहे. त्यामुळे गावकऱ्यांना आता पावसाळ्यात खड्डे आणि चिखलाचा सामना करून ये-जा करावे लागत आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली ही मागणी असुन याकडे कंपनी प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोपही गावकऱ्यांनी केला आहे. वारंवार कंपनी प्रशासनाला सांगून निवेदन दिले असता याची दखल न घेतल्यामुळे शेवटी गावकऱ्यांचा संयम सुटल्याने गावकऱ्यांनी महिला, पुरुष, लहान विद्यार्थ्यांसह कंपनी प्रशासनाच्या प्रशासकीय इमारती समोरच धरणे आंदोलन सुरू केले. साधारणतः दोन ते तीन किमी अंतर असलेला हा रस्ता नांदा फाटा औद्योगिक वसाहतीला जोडणारा असून याच रस्त्याने गावकऱ्यांना बँक पोस्ट ऑफिस शाळा महाविद्यालय व गडचांदूर शहराकडे जावे लागते. रात्रपाळीत रस्त्याने प्रवास करणे जीवघेणे ठरले असून मोठे खड्डे मृत्यूला आमंत्रण देत आहे. सोबतच रस्त्याच्या बाजूला असलेल्या खदानीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतकरी, कामगार, विद्यार्थांचे मोठे हाल होत आहे. सदर गाव कंपनी अंतर्गत दत्तक गाव येत असून या गावापर्यंत सिमेंट रस्ता करावा अशी मागणी याप्रसंगी गावकऱ्यांनी केली आहे. कोणतीही अनुचित घटना घडू नये या करिता गडचांदूर पोलीस ठाण्यात माहिती मिळताच पोलीस त्या ठिकाणी उपस्थित झाले. या संदर्भात कंपनी प्रशासनाशी चर्चा करून तोडगा काढण्यासाठी गावच्या सरपंच अलका पायपरे, शैलेश लोखंडे, नरेंद्र मडावी, ग्रा.सदस्य अनिल आत्राम, विमल गेडाम, ज्योती कुंभारे, गौतम खोब्रागडे, अतुल निमसटकार, विठ्ठल मावलीकर, कवडू गेडाम यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक प्रमोद शिंदे, धर्मराज मुंडे, सुषमा अडकीने उपस्थित होते. कंपनी प्रशासनाचे कर्नल डे, मिश्रा, सचिन गोवरदिपे यांच्या सोबत चर्चा करून त्यांनी तात्काळ रस्त्याचे खड्डे बुजवून खडीकरण करून देण्यात येईल .

# ऐन शेतीच्या हंगामात कालव्याची पाळ फुटली

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
यावर्षी अती पाऊसमुळे पहिलेच अस्मानी संकट आल्याचे दिसून येत असतानाच शेतीच्या ऐन हंगामात कालव्याची पाळ फुटल्याने शेतक-यांचे मोठया प्रमाणांत नुकसान झाले असून सदर पाळीची तातडीने पुर्नबांधणी न झाल्यास भविष्यात पुन्हा अडचणींचा सामना करावा लागेल. अशी शक्यता व्यक्त केल्या जात आहे.

सिदेवाही तालुक्यातील नलेश्वर तलावाच्या अनेक कालव्यांपैकी एक कालवा मूल तालुक्यातील मारोडा मार्गावरील कोसंबी पर्यंत येतो. २२ कि.मी. लांबीच्या सदर कालव्याची निगा, देखरेख आणि दुरूस्ती करण्याची जबाबदारी सिंचाई विभागाची



आहे. त्यामूळे शेतीच्या हंगामापूर्वी येथील सिंचाई उपविभागाने आवश्यकतेच्या काळात शेतक यांना तलावाचे पाणी पुरविता यावे म्हणून कालव्याची पाहणी करून किरकोळ दुरुस्त्या केल्या. परंतू मागील काही दिवसांपूर्वी झालेल्या संततधार अतीवृष्टीमूळे सोमनाथ डोंगर परिसरातील पावसाचे पाणी लगतचे शेत आणि कालव्यात तुडूंब भरले, त्यामूळे सोमनाथ पासून काही दूर अंतरावर शेताला लागुन असलेल्या कालव्याची मोठी पाळ फुटली. त्यामूळे कालव्यात साचलेले पावसाचे पाणी लगतच्या शेतात गेल्याने अनेक पेरणी वाहुन गेली तर काही खराब झाल्या. सदर प्रकाराची माहिती नुकसानग्रस्त शेतक-यांनी येथील सिंचाई उपविभागाला दिली. परंतू अजूनही दुरूस्तीच्या कामाला सुरूवात झालेली नाही. कालव्याची फुटलेली पाळ तातडीने दुरूस्त न केल्यास परिसरातील शेकडो शेतक-यांना नुकसानीला तोंड दयावे लागणार आहे, शिवाय आवश्यकतेच्या काळात नहराद्वारे शेतीला पाणी न मिळाल्यास अथक प्रयत्नाने उभे केलेले पीक हातातुन जाते की काय. अशी शेतक यांना भिती आहे.कालवा फुटलेल्या ठिकाणी भेट दिली तेव्हा ५० ते ६० फुट लांब पा फटलेली असन मोठया प्रमाणांत पाणी शेतात जात आहे शेतक-यांचे नुकसान टाळण्यासाठी सिंचाई विभागाने त्वरित कालव्याची दुरस्ती करावी याबाबत आमदार सुधीर मुनगंटीवार यांना माहिती दिली.

# केंद्र शासनाच्या एकात्मीक उर्जा विकास योजनेमधून विकास

## चंद्रपूर मंडळात ८ नवीन उपकेंद्रे जनतेच्या सेवेत

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना आणली केंद्र सरकारची एकात्मीक उर्जा विकास योजना जाहिर करण्यात आली होती. चंद्रपूर परिमंडळ अंतर्गत चंद्रपूर मंडळातील चंद्रपूर, वरोरा व बल्लारशा या तीन विभागात सदर योजनेमधून वणीबायपास, राजूरा, बामनवाडा, भद्रावती, बल्लारशाह एफडीसीएम, समाधी वार्ड गॅस इंसुलेटेड उपकेंद्र),विश्वकर्मा एअर ईंसुलेटेड उपकेंद्र), वरोरा एम आयडीसी, ब्रम्हपुरी समाधी उदापुर अशी ३३ केव्हीची ८ नवीन उपकेंद्रे उभारण्यात आली. त्याचप्रमाणे सुमारे १४३ किमी च्या उच्चदाब तर ३८ कि.मी. च्या लघुदाब वाहिन्या उभारण्यात येत आल्या. याशिवाय २६३ वितरण रोहित्रे उभारण्यात आली.

आजादी का अमृत महोत्सवाअंतर्गत 'उज्ज्वल भारत-उज्ज्वल भविष्य-पॉवर '२०४७' हा कार्यक्रम भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालय व नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय व महाराष्ट्रातील महावितरण राज्य शासनाच्या सहकार्याने दि. २५ ते ३० जुलै या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या एकात्मीक उर्जा विकास योजनेंतर्गत राज्याच्या २५४ शहरांतील वीज यंत्रणेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात आली असून असून ८ ऑक्टोबर २०१५ मध्ये या योजनेची घोषणा होवून केवळ तीनच वर्षात आतापर्यंत नविन उपकेंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार ५ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये या योजनेतील कामे होणार होती. राज्यात इतर ठिकाणी मोठया उपकेंद्रांची क्षमतावाढ करण्यात येवून रोहित्रे नविन बसविण्यात आली.

तसेच १ हजार उपकेंद्रांची क्षमतावाढ करण्यात येत किमी नविन उच्चदाब वीजवाहिनी व किमी लघुदाब वीजवाहिनी ओढण्याचे काम पुर्ण करून महावितरणने शहरी भागातील ग्राहकांना उच्चदाब वीजवाहिनी व किमी लघुदाब वीजवाहिनी ओढण्याचे काम पुर्ण करून महावितरणने शहरी भागातील ग्राहकांना उच्चप्रतिचा गुणवत्तापूर्ण शाश्वत विजपुरवठा मिळण्यासाठी कार्य या योजनेमधून करण्यात आले आहे. अशी माहिती चंद्रपूर मंडळाच्या अधिक्षक अभियंता संध्या चिवंडे यांनी दिली आहे.

# आरक्षण सोडत व प्रारूपावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी कार्यक्रम जाहीर

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
जिल्हा परिषद, चंद्रपूर व जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता आरक्षण सोडत व आरक्षण प्रारूपावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२ उपकलम (१), कलम ५८(१)(अ) प्रमाणे व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ नुसार अनुक्रमे जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (स्त्रियांच्या आरक्षणासह) राखून ठेवावयाच्या जागा आणि उर्वरित स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्यानुसार आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत काढणे तसेच आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद चंद्रपूर, करीता सभा दि. २८ जुलै २०२२ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन येथील सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडेल. आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्याचा दि. २९ जुलै २०२२ असून आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी व संबंधित तहसीलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी हा २९ जुलै ते २ ऑगस्ट २०२२ पर्यंत राहील. पंचायत समिती चिमूर, नागभीड, ब्रह्मपुरी, सिंदेवाही, भद्रावती, वरोरा, चंद्रपूर, मुल, सावली, पोंभुर्णा, गोंडपिपरी, बल्लारपूर, कोरपना, जिवती व राजुराकरीता आरक्षण निश्चित करण्यासाठी सभा दि. २८ जुलै २०२२ रोजी सकाळी ११ वाजता त्या त्या संबंधित तहसील कार्यालयात पार पडेल. आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्याचा दि. २९ जुलै २०२२ राहील तर आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी व संबंधित तहसीलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी हा २९ जुलै ते २ ऑगस्ट २०२२ पर्यंत राहील.

जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा असेल त्यांनी वरील ठिकाणी विहित वेळेत हजर राहावे, असे उपजिल्हाधिकारी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी अश्विनी मांजे यांनी कळविले आहे.

## नगरपरिषद व नगरपंचायत आरक्षण सोडत २८ जुलै रोजी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
राज्य निवडणूक आयोगाने चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, वरोरा, राजुरा, मुल, चिमूर, घुग्गुस व नागभीड या नगर परिषदांमधील व भिसी नगर पंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करावयाचे आहे.

त्याअनुषंगाने, नगरपरिषद व नगरपंचायतीचे आरक्षण सोडत गुरुवार, दि. २८ जुलै २०२२ रोजी दुपारी १२ वाजता संबधित नगरपरिषद/नगरपंचायत कार्यालयात पार पडणार आहे. नगरपरिषद व नगरपंचायतीचे आरक्षण सोडत इत्यादीपासून अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यापर्यंतच्या कार्यवाही वर नियंत्रण ठेवण्यासाठी पिठासीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यात बल्लारपूर न.प करीता उपविभागीय अधिकारी बल्लारपूर, वरोरा न.प. करीता उपविभागीय अधिकारी वरोरा, मुल न.प. करीता उपविभागीय अधिकारी मुल, राजुरा न.प. करीता उपविभागीय अधिकारी राजुरा, चिमूर न.प. करीता उपविभागीय अधिकारी चिमूर, नागभीड न.प. करीता उपविभागीय अधिकारी नागभीड व घुगुस न.प. करीता उपविभागीय अधिकारी चंद्रपूर तर भिसी नगर पंचायतीकरिता उपविभागीय अधिकारी, गोंडपिपरी यांची पिठासीन अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तरी, वरीलप्रमाणे आरक्षण निश्चित सोडतीच्यावेळी संबंधित नगर परिषद / नगर पंचायत क्षेत्रातील इच्छुक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी केले आहे.

# गोंड़पिपरीत आर्य वैश्य कोमटी समाजाची नवीन कार्यकारणी गठीत

## अध्यक्षपदी अजय माडुरवार यांची निवड

**गोंडपिपरी / प्रतिनिधी**
आर्य वैश्य कोमटी समाजाची बैठक रविवारी(दि.२४)पार पडली.या बैठकीत शेकडो समाजबांधवांची उपस्थिती होती.समाजाच्या प्रत्येक घटकांबद्दल विकासात्मक चर्चा करण्यात आली.यावेळी नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली.निवडणूक अधिकारी जयश्री मोगरे चंद्रपुर यांचे देखरेखीखाली सदर निवडणूक प्रक्रिया पार पडली.सर्वानुमते बिनविरोध पदाधिकारी ठरविन्यात आले.यावेळी अध्यक्षपदी अजय माडुरवार,उपाध्यक्ष सुहास माडुरवार,रविन्द्र वेगीनवार,सचिवपदी संतोष केशेट्टीवार, सहसचिव मनोज नरहरशेट्टीवार, कोषाध्यक्ष संदीप उत्तरवार, सदस्य म्हणून डॉ राजेन्द्र उत्तरवार, किशोर माडुरवार, अभय कासनगोटूवार, सचिन चिंतावार,अमित वेगीनवार, स्वप्निल बोनगिरवार, रितेश वेगीनवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे आर्य वैश्य कोमटी समाजबांधवांनी अभिनंदन केले.



## मालगाडीच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**चंद्रपूर :** रिपरिप पाऊस सुरु असल्याने तो शेताची पाहणी करण्यासाठी शेतशिवारात गेला. दरम्यान गोंदिया - रेल्वे लाईन मार्गाने घराकडे येत असताना एका मालगाडीने पोल क्रमांक ८८४/१७ सी ते ८८५/१ सी दरम्यान मागून जबरदस्त धडक दिली. या धडकेत तो जागीच ठार झाला.